393

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,पुणे.

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
चौथा मजला,काकडे बीझ् आयकॉन, ई-स्क्वेअरजवळ,
अशोकनगर, गणेशखिंड रोड, शिवाजी नगर, पुणे-४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (O) : ०२०-२५५७७९९९
ईमेल- : srapune@yahoo.in वेबसाईट: www.srapune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.झोपुप्रा/प्रशा/२५०५ /२०२१
दिनांक : ०२/१२ /२०२१

<u>कार्यालयीन परिपत्रक क्र</u> :- ३५/२०२१

विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदींचे तंतोतंत पालन करणेबाबत.

जन माहिती अधिकाऱ्यांकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या अनुषंगाने अधिनियमातील तरतूदीनुसार संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांकडून कार्यवाही करण्यात येत नसल्याचे काही तक्रारी अर्ज इकडे प्राप्त झाले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदींचे तंतोतंत पालन होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

१. जन माहिती अधिकारी / सहायक जन माहिती अधिकारी यांनी अर्ज स्विकारल्यानंतर प्रथम माहिती अधिकार अर्जासाठी ठेवलेल्या स्वतंत्र नोंदवहीत त्याची नोंद घ्यावी.
२. अर्जदाराने मागितलेली माहिती अन्य प्राधिकरणाकडे उपलब्ध असेल तर असा अर्ज प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावा.
३. माहिती मिळण्याचा विनंती अर्ज मिळाल्यानंतर शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसाच्या आत विहीत केलेल्या फी चे प्रदान केल्यानंतर अर्जदारास देय माहिती उपलब्ध करून द्यावी.
४. फी भरणा करण्याबाबत सूचना पाठविल्याच्या व फी चे प्रदान केल्याच्या दरम्यानचा कालावधी विनिर्दिष्ट केलेल्या तीस दिवसांच्या कालावधीची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ वगळण्यात येईल.
५. अर्जदाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागविली असल्यास अशी माहिती प्रकट करावी किंवा कसे याबाबत कलम ११ (१) नुसार त्रयस्थ पक्षास नोटीस देऊन १० दिवसाच्या आत प्रस्तावित माहिती प्रकट करण्याविषयी निवेदन सादर करण्याची संधी देण्यात यावी. याप्रकरणी माहिती पुरविण्याचा विनिर्दिष्ट कालावधी ४० दिवसांचा राहील.
६. विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत माहिती देण्यास उशीर झाल्यास माहिती मिळण्याची विनंती केलेल्या व्यक्तीस ती माहिती मोफत देण्यात यावी.

७. अर्जदाराने मागणी केलेली माहिती द्यावयाची असल्यास अथवा नाकारावयाची असल्यास माहिती नाकारण्याचे कारण व त्याचे अपीलाचे हक्क उदा. अपील कोणाकडे व किती मुदतीत करावे हा तपशील अर्जदारास पाठवावयाच्या पत्रात नमूद करावा.

८. माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या प्रतीवर सर्वसाधारणपणे माहिती अधिकारांतर्गत पुरविलेली माहिती असा शिक्का मारावा.

९. अर्जदारास माहिती पुरविताना लेखनसामग्रीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या बोधचिन्हाचा (Logo) वापर करावा.

१०. प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याने सर्वसाधारण परिस्थितीत ३० दिवसांत व अपवादात्मक परिस्थितीत ४० दिवसात प्राप्त अपीलावर निर्णय घ्यावा.

११. पहिले अपील दाखल करण्याची कालमर्यादा ३० दिवस आहे. अपवादात्मक परिस्थितीत अपीलकाराच्या विलंबाबाबत अपीलीय प्राधिकाऱ्याचे समाधान झाल्यास ३० दिवसानंतरही अपील दाखल करून घेता येईल.

१२. प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याने निकालपत्र करताना, अपील नाकारण्याची कारणमिमांसा व त्याचे द्वितीय अपीलाचे हक्क उदा. द्वितीय अपील कोणाकडे व किती मुदतीत करावे हा तपशील निकालपत्रात नमूद करावा.

१३. जन माहिती अधिकारी यांनी पत्राच्या शेवटी व प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी निकालाच्या शेवटी स्वाक्षरीखाली आपले नाव व पदनाम न चुकता नमूद करावे.

१४. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मासिक अहवाल एकत्रित करुन मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे दरमहा ५ तारखेपर्यत पाठवावा लागतो. त्याअनुषंगाने या प्रकरणी दर महिन्याचा मासिक अहवाल त्यानंतरच्या महिन्याच्या २ तारखेपर्यत न चुकता आस्थापना विभागाकडे सादर करावा. अहवाल सादर करण्यास विलंब झाल्यास संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

१५. माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार कार्यालयाच्या संकेतस्थळावर आवश्यक ती सार्वजनिक माहिती अद्ययावतपणे उपलब्ध करून देणेची जबाबदारी संगणक अधिकारी व संगणक विभागातील कर्मचारी यांची असेल.

उपरोक्त सूचनांचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता प्रथम अपीलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी व सर्व संबंधितांनी घ्यावी.

2.12.21

(राजेंद्र निंबाळकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत/- तात्काळ अंमलबजावणी साठी
सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी.